☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट/335/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 दिनांक : 28/08/2025

# ''पोलीस स्टेशन इतवारा येथील खुनाच्या गुन्ह्यामधील आरोपीस मा. न्यायालयाने ठोठावली जन्मठेप व द्रव्यदंडाची शिक्षा..''

पोलीस स्टेशन इतवारा हद्दीत दिनांक 14.08.2016 रोजी 17.00 वा. चे सुमारास केळी मार्केट इतवारा येथे मयत नामे सय्यद गौस सय्यद मिया हसनजी, वय 55 वर्षे, रा.देगलुर नाका ता. जि.नांदेड हे त्यांचे केळी मार्केट मधील दुकानावर असतांना कुणीतीर अज्ञात इसमाने त्यांचे दुकानातील दहा हजार रूपयांची चोरी करून त्यांचा गळा दाबुन खुन केला वगैरे फिर्यादी नामे महम्मद जावेद अब्दुल जलील, वय 37 वर्षे, रा.देगलुर नाका नांदेड यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोस्टे इतवारा गु.र.नं. 111/2016 कलम 302,394 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास सपोनि श्री एस डी आव्हाड यांनी उत्तम प्रकारे करून गुन्हा उघडकीस आणुन गुन्ह्यात भक्कम पुरावे जमा केले व मा. न्यायालयात आरोपी विरूध्द दोषारोप सादर केले. सदर प्रकरणात मा. अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश 01,नांदेड यांचे कोर्टाने सरकार पक्षाच्या वतीने पुरावे ग्राहय धरून आरोपी नामे शिवशंकर आशोकराव बिराजदार, वय 25 वर्षे, रा.माळेगाव ता.देगलुर जि.नांदेड यास कलम 302,394 भादवी अंतर्गत जन्मठेप व 2000/- रूपये द्रव्यदंड अशी शिक्षा सुनावली आहे.

**मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड यांनी पोस्टे स्थरावर दाखल गुन्हयामध्ये आरोपींना तात्काळ अटक करून, भक्कम पुरावे गोळा करून मा.न्यायालयात लवकरात लवकर दोषारोप पत्र दाखल करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी यांना आदेशीत केले व मा. न्यायालयात चालू असलेल्या खटल्यांमध्ये विशेष लक्ष देणे बाबत सुचित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने सरकारी अभियोक्ता श्री रणजीत देशमुख साहेब यांनी सरकार पक्षाची बाजु मांडली श्री रणजीत भोईटे, प्रभारी अधिकारी पो स्टे इतवारा यांचे मार्गदर्शना खाली संपुर्ण खटल्याचे दरम्यान कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोहेकॉ/380 श्री बालाजी लांबतुरे यांनी कामकाज पाहीले.

सदर प्रकरणी **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड यांनी पोस्टे इतवारा तपास अधिकारी व पैरवी अधिकारी यांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड